# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


## महाराष्ट्र वन सेवा मुख्य परीक्षा-२०१६

**क्रमांक : एमएफएम-१६१६/सीआर-३३/२०१६/तीन** **जाहिरात क्रमांक : ३४/२०१६**

जाहिरात क्रमांक ५/२०१६, दिनांक ३ फेब्रुवारी, २०१६ नुसार राज्य शासनाच्या सेवेतील वनक्षेत्रपाल, गट-ब संवर्गातील ५५ पदांवरील भरतीसाठी आयोगामार्फत दिनांक ३ एप्रिल, २०१६ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र वन सेवा पूर्व परीक्षा-२०१६ च्या निकालाआधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी अर्हतापात्र ठरलेल्या उमेदवारांची महाराष्ट्र वन सेवा मुख्य परीक्षा-**२०१६** रविवार, दिनांक **१४** ऑगस्ट, **२०१६** रोजी फक्त मुंबई येथे घेण्यात येईल.

**२. उपलब्ध पदसंख्या :-**

| **१. वनक्षेत्रपाल, गट-ब (एकूण ५५ पदे)** | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र. | एकूण मागासवर्गीय | खुला | एकूण पदे |
| पदसंख्या | ५* | ३* | २* | -- | -- | ३* | २९* | -- | ४२ | १३ | ५५ |
| **रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-** | | | | | | | | | | | |
| (१)सर्वसाधारण | १ | २ | १ | -- | -- | २ | १८ | -- | २४ | ७ | ३१ |
| (२) महिला | २ | १ | १ | -- | -- | १ | ९ | -- | १४ | ४ | १८ |
| (३) खेळाडू | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | २ | १ | ३ |
| (४) वनशास्त्र पदवीधारक | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | २ | १ | ३ |
| * अनुशेषाची पदे | | | | | | | | | | | |

**२.१** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**२.२** महिला व खेळाडूंचे आरक्षण शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**२.३** महिलांसाठी आरक्षित पदांकरीता दावा करणा-या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत तसेच नॉन क्रीमीलेअर मध्ये मोडत असल्याबाबत (अ.जा. व अ. ज. वगळून) स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.तसेच त्याप्रित्यर्थ अद्ययावत नॉन क्रीमीलेयर दाखला मुलाखतीच्या वेळी सादर करणे अत्यावश्यक राहील.

**२.४** वि.जा (अ), भ.ज. (ब), भ.ज. (क) व भ.ज. (ड) वर्गवारीसाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित वर्गवारीतील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध वर्गवारीच्या उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

**२.५** गुणवत्ताधारक पात्र खेळाडू आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांनी त्यांची प्रमाणपत्रे ते ज्या संवर्गासाठी अर्ज करीत आहेत, त्याकरीता विहित दर्जाची असल्याबाबत, या पदासाठी अर्ज सादर करताच सक्षम प्राधिका-याकडून खातरजमा करुन घ्यावी. तरच त्यांना गुणवत्ताधारक पात्र खेळाडू आरक्षणाचा लाभ घेता येईल.

**२.६** खेळाडूंसाठी आरक्षित पदाकरीता दावा करणाऱ्या उमेदवारांनी त्यांची पात्र खेळाडू असल्याबाबतची **सर्व प्रमाणपत्रे** मुलाखतीस आमंत्रित केल्यानंतर प्रस्तुत पदांच्या मुलाखतीपूर्वी संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्याकडून प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे. तसेच संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांच्याकडे प्रमाणपत्रे सादर करताना खेळाडू उमेदवाराने आपली खेळाडू विषयक **सर्व प्रमाणपत्रे** एकाच वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**२.७** समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**२.८** परीक्षेच्या कोणत्याही टप्प्यावर मागासवर्गीयासाठी विहित केलेली वयोमर्यादा, परीक्षा शुल्क तसेच इतर पात्रता विषयक अटी/निकषांसंदर्भात कोणतीही सूट/सवलत घेतली असल्यास अशा उमेदवारांची अमागास (सर्वसाधारण) पदावर शिफारस करण्यात येणार नाही.

**२.९** शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक एफटीआर १५/०४/प्र.क्र. १३६/फ-४, दिनांक १० फेब्रुवारी, २००९ नुसार प्रस्तुत पदावर नियुक्तीसाठी विकलांग उमेदवार पात्र नाहीत.

**३.** प्रस्तुत भरतीकरीता "महाराष्ट्र शासकीय गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने नियुक्तीसाठी महसूली विभाग वाटप नियम, २०१५" लागू आहे.

**४. वेतनश्रेणी :-**

रूपये ९,३०० – ३४,८०० अधिक (ग्रेड पे रुपये ४,४००) अधिक नियमानुसार भत्ते

**५. पात्रता :-**

**५.१** भारतीय नागरिकत्व

**५.२ वयोमर्यादा :- दिनांक १ जून, २०१६** रोजी किमान २१ वर्षे असावे व ३३ वर्षांपेक्षा (मागासवर्गाकरिता ३८ वर्षांपेक्षा ) जास्त नसावे.

**५.३** उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम :-

**५.३.१** महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम.

**५.३.२** पात्र खेळाडूंच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम.

**५.३.३** माजी सैनिक,आणिबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम .

**५.३.४** विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

**५.४ शैक्षणिक अर्हता :-**

**५.४.१** वनस्पतीशास्त्र,रसायनशास्त्र, वनशास्त्र, भूशास्त्र, गणित, भौतिकशास्त्र, सांख्यिकी, प्राणिशास्त्र, उद्यानविद्या शास्त्र, कृषी शास्त्र, कृषी अभियांत्रिकी,रसायन अभियांत्रिकी, स्थापत्य अभियांत्रिकी, संगणक अभियांत्रिकी, विदयुत अभियांत्रिकी, इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी, यंत्र अभियांत्रिकी, संगणक ॲप्लिकेशन, संगणक विज्ञान, पर्यावरणीय विज्ञान, पशुवैद्यकीय विज्ञान यांपैकी कोणत्याही विषयातील सांविधिक विदयापीठाची विज्ञान शाखेची पदवी किंवा विज्ञान शाखेव्यतिरिक्त इतर शाखेतील गणित विषयासह पदवीधारक .

**५.४.२** विज्ञान शाखेव्यतिरिक्त इतर शाखेतील गणित विषयासह पदवीधारक उमेदवाराने विज्ञान शाखेतील उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**५.४.३** वन शास्त्र पदवीधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे वरील परिच्छेद क्रमांक **५.४.१ व ५.४.२** मध्ये नमूद अर्हता धारकामधून भरण्यात येतील.

**५.४.४** पदवी परीक्षेस बसलेले उमेदवार प्रस्तुत परीक्षेस पात्र असतील, परंतु महाराष्ट्र वन सेवा मुख्य परीक्षा-२०१६ च्या प्रवेशासाठी पात्र ठरणा-या उमेदवारांनी महाराष्ट्र वन सेवा मुख्य परीक्षा-२०१६ करीता अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**५.५** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

**५.६ शारीरिक मानके -**

**५.६.१ खालीलप्रमाणे शारीरिक पात्रता पूर्ण केलेली असावी :-**

(१) अनुसूचित जमाती व्यतिरिक्त अन्य उमेदवार -

| **अ.क्र.** | **पात्रता** | **महिला** | **पुरुष** |
|---|---|---|---|
| १. | उंची | १५० सें.मी.पेक्षा कमी नसावी | १६३ सें.मी. पेक्षा कमी नसावी |
| २. | छाती | -- | (१ ) न फुगवता ७९ सें.मी.पेक्षा कमी नसावी<br>(२) न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ सें.मी. पेक्षा कमी नसावा. |

(२) अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवार –

| **अ.क्र.** | **पात्रता** | **महिला** | **पुरुष** |
|---|---|---|---|
| १. | उंची | १४५ सें.मी.पेक्षा कमी नसावी | १५२.५ सें.मी. पेक्षा कमी नसावी |
| २. | छाती | -- | (१ ) न फुगवता ७९ सें.मी.पेक्षा कमी नसावी<br>(२) न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ सें.मी. पेक्षा कमी नसावा. |

**५.६.२** सुधारणेनंतर (आफ्टर करेक्शन) + 4.00 D सह प्रत्येक डोळयाची दृष्टीतीक्ष्णता (व्हिज्युअल अक्विटी ) ६/६ असावी. बाहय डोळयावर कोणतेही रोग संक्रमण झालेले नसावे किंवा तिरळेपणा नसावा.

**५.६.३** पुरुष व महिला उमेदवारामध्ये अनुक्रमे २५ कि.मी. व १४ कि.मी. अंतर ४ तासात चालून पूर्ण करण्याची शारीरिक क्षमता असणे आवश्यक आहे.

**५.६.४** प्रस्तुत परीक्षेच्या अंतिम निकालाच्या आधारे शिफारस झालेल्या उमेदवारांची नियुक्ती करण्यापूर्वी त्यांची शारीरिक मोजमापे शासनाच्या संबंधित विभागामार्फत सक्षम प्राधिका-याकडून तपासून घेण्यात येतील. तसेच वैदयकीय चाचण्या घेण्यात येतील. वरीलप्रमाणे शारीरिक मोजमापे न भरल्यास व वैदयकीय चाचणीमध्ये पात्र न ठरल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी अपात्र ठरेल.

**६. परिविक्षाधीन कालावधी व प्रशिक्षण :-**

**६.१** परिविक्षाधिन कालावधी ३ वर्षांचा असेल.

**६.२** केंद्र शासनाने मान्यता दिलेल्या वनशास्त्र प्रशिक्षण महाविदयालयातील दीड वर्ष कालावधीचे प्रशिक्षण तसेच प्रधान मुख्य वन संरक्षक किंवा मुख्य वनसंरक्षक यांनी विहित केलेले दीड वर्षाचे क्षेत्रीय प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणे व विहित विभागीय परीक्षा उत्तीर्ण करणे आणि परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील.

**६.३** विहित प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण न केल्यास किंवा विहित विभागीय परीक्षा उत्तीर्ण न केल्यास किंवा परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण न केल्यास किंवा उमेदवार सदर पदासाठी योग्य नसल्याचे आढळून आल्यास तो/ती सेवा समाप्त करण्यास पात्र राहील.

**६.४** वनक्षेत्रपालांच्या नियुक्तीची परस्पर जेष्ठता आयोगाने घेतलेल्या परीक्षेत गुणवत्तेच्या आधारे उमेदवाराने मिळवलेले गुण व प्रशिक्षण पाठयक्रमाच्या शेवटी घेण्यात येणा-या अंतिम परीक्षेत मिळविलेले गुण एकत्रित करुन निर्धारित केली जाईल.

**६.५** प्रशिक्षण कालावधीमध्ये शासनाने निश्चित केलेल्या दराने विदयावेतन देण्यात येईल.

**७. बंधपत्र :-**

**७.१** निवड झालेल्या उमेदवाराने नियुक्तीनंतर विहित प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच प्रशिक्षण पूर्ण केल्यावर सदर पदावर किमान ७ वर्ष सेवा पूर्ण करावी लागेल.

७.२ विहित प्रशिक्षण पूर्ण न केल्यास किंवा विहित किमान ७ वर्ष कालावधीची सेवा पूर्ण न केल्यास, प्रशिक्षणावरील खर्चासाठी शासनाकडून वेळोवेळी निश्चित करण्यात येईल इतक्या रकमेची प्रतिपूर्ती करावी लागेल.

**७.३** याबाबतची संबंधित बंधपत्रे उमेदवारास नियुक्तीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहतील.

८. नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील :-

८.१ जेथे प्रचलित नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

८.२ हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

८.३ महाराष्ट्र शासनाच्या महिती तंत्रज्ञान संचालनालयाने विहित केलेले संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

**९. परीक्षेचे टप्पे - दोन**

(१) मुख्य परीक्षा - ४०० गुण
(२) मुलाखत - ५० गुण

**१०.मुख्य परीक्षेस प्रवेश :-**

१०.१ महाराष्ट्र वनसेवा पूर्व परीक्षा -२०१६ च्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या आणि पूर्व परीक्षेच्या जाहिरातीत नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची **दिनांक ८ जुलै, २०१६** रोजी किंवा त्यापूर्वी पूर्तता करणा-या उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

१०.२ पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करताना जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे विहित शैक्षणिक अर्हता धारण करीत नव्हते, परंतु **दिनांक ८ जुलै, २०१६** रोजी किंवा त्यापूर्वी शैक्षणिक अर्हता धारण करीत आहेत, अशा उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक ऑनलाईन पध्दतीने नोंदविणे आवश्यक आहे. त्याशिवाय त्यांना मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

१०.३मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवाराने आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या कालावधीत आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळाद्वारे फक्त ऑनलाईन पध्दतीने माहिती सादर करणे आवश्यक आहे.

१०.४ पूर्व परीक्षेकरीता आयोगास अर्जाद्वारे सादर केलेल्या माहितीच्या आधारेच प्रस्तुत मुख्य परीक्षेकरीता आवश्यक माहिती ऑनलाईन पध्दतीने सादर करणे आवश्यक राहील.

१०.५ **पात्रतेसंदर्भात अर्जामधील दाव्याच्या पुष्टर्थ मुलाखतीच्या वेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. सदर मूळप्रमाणपत्रे मुलाखतीच्या वेळी सादर न केल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल.**

**११. शुल्क : ११.१ :-** अमागास - **रु. ५२३/-** **११.२ :-** मागासवर्गीय - **रु. ३२३/-**

**१२. अर्ज करण्याची पद्धत :-**

१२.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील.

१२.२ पात्र उमेदवाराला वेब आधारित (Web-based) ऑनलाईन अर्ज https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळाद्वारे **दिनांक २४ जून, २०१६ ते ८ जुलै, २०१६** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

१२.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज/माहिती सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

१२.४ ऑनलाईन पद्धतीने **आयोगास अर्ज सादर करताना माध्यमिक शालांत प्रमाणपत्रावर असलेल्या नावाप्रमाणेच नोंदणी करणे व आयोगास अर्ज सादर करणे आवश्यक आहे .** अन्यथा आयोगाच्या सूचनांचे उल्लंघन समजून कारवाई करण्यात येईल.

**१२.५ आयोगास चुकीची माहिती सादर करणा-या उमेदवारास सदर परीक्षेसाठी व यापुढील सर्व निवडीकरीता अपात्र ठरविण्यात येईल.**

१२.६ **विहीत पध्दतीने** आयोगास अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

१२.७ परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरीता खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

१२.७.१ शुल्क भरण्याकरीता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील **'माझे खाते'** या लिंक वर क्लिक करावे.

१२.७.२ **'माझे खाते'** या लिंक वर क्लिक केल्यानंतर **'माझे ॲप्लिकेशन'** सदरातील **'स्पर्धात्मक परीक्षा'**या लिंक वर क्लिक करावे.

१२.७.३ **'स्पर्धात्मक परीक्षा'** या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर ' **Unpaid**' असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी ' **Pay Now**' अशी लिंक उपलब्ध असेल.

१२.७.४'**Pay Now** ' या लिंक वर क्लिक केल्यानंतर तीन पर्याय उपलब्ध होतील. (अ) ऑनलाईन पेमेंट (ब) नागरी सुविधा केंद्र (क) चलनाद्वारे

१२.७.५ क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करता येईल.

१२.७.६ नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. सदर कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

१२.७.७ चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

१२.७.८ भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर केल्यास त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

१२.७.९ ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा झाला आहे किंवा कसे याची स्थिती (Status) अवगत होईल. त्याची उमेदवाराने अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीच तपासणी करुन खात्री करणे आवश्यक आहे. विहित दिनांकानंतर यासंर्भातील कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

१२.७.१० विहित पध्दतीने अर्ज सादर करुन ऑनलाईन शुल्क भरण्याची कार्यवाही, तसेच भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही **दिनांक ८ जुलै, २०१६ रोजी २३.५९ वाजेपर्यंत** पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

१२.७.११ चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये **दिनांक ११ जुलै, २०१६** पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

**१३. प्रवेशप्रमाणपत्र :-**

**१३.१**प्रस्तुत परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे ७ दिवस अगोदर प्रवेशप्रमाणपत्र आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीमधील उमेदवाराच्या प्रोफाईलदवारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१३.२** परीक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वत: चे प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**१३.३** परीक्षेस येतेवेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड किंवा ड्रायव्हिंग लायसेन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी किमान कोणतेही एक मूळ ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

**१४.** प्रस्तुत अधिसूचनेमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी माहिती स्वीकारण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावरील स्पर्धा परीक्षा अंतर्गत "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**" तसेच "**परीक्षा** " या विभागातील " **महाराष्ट्र वन सेवा परीक्षा**" अंतर्गत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन व्हावे. आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**१५.** प्रस्तुत परीक्षेचा सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**१६.** सदर अधिसूचना आयोगाच्या www.mpsc.gov.in तसेच https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २४ जून, २०१६**

**सु. ह. अवताडे**
**अवर सचिव,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग.**

**(१) आयोगाच्या कार्यालयात,परीक्षा कक्षात,परीक्षा केंद्राच्या परिसरात,तसेच,शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.**
**(२) मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्र सादर न केल्यास सदर परीक्षेची उमेदवारी नाकारली जाईल.**